आदित्य प्रतिष्ठान

वर्ष : १२ / अंक : १ व २

# आदित्यदीप

जानेवारी ते जून २०२१






'आदि शंकराचार्य' यू-ट्यूबवरील गुरुदेवांचे प्रवचन

जानेवारी ते जून २०२१ शके १९४३

"आपुल्या पुरुषार्थवैभवें । बहुतांस सुखी करावें ।।"



# आदित्यदीप



कार्यकारी संपादक
सौ. अपर्णा अभ्यंकर

(आदित्य प्रतिष्ठानचे वार्तापत्र)

संस्थापक-संपादक
गुरुदेव शंकर अभ्यंकर

वर्ष : १२ अंक : १ व २


## अंतरंग

संपादकीय – कोरोना-आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक ताप
सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर ———— ३





शङ्कर रामायण – अरण्यकाण्ड ———— ७



श्री परशुराम – विष्णूंचा सहावा अवतार ———— ८



गुरु तेगबहादूर – चतु:शताब्दी जयंती ———— १५



संतभारती क्षणचित्रे ———— २१
श्रद्धांजली - श्री. आण्णा विद्वांस, डॉ. प्रफुल्ल वाणी ———— २२
विनम्र आवाहन ———— २३



माझ्या तरुण मित्रांनो – गुरुदेव ———— २४

आजीव सभासद वर्गणी रु. २०००/- (१० वर्षांसाठी) आजच आदित्यदीपचे वर्गणीदार व्हा!

संपादकीय

# कोरोना

## आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक ताप



– सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर

सस्नेह नमस्कार,

मानवी जीवनात सुखाबरोबर दु:ख आहे याबद्दल कोणालाच संशय नाही. या दु:खाचे आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक असे तीन भेद आहेत. बाह्य संयोगावाचून आलेली दु:खे (म्हणजे देह, इंद्रिये आणि प्राण यांच्यामुळे वाट्याला आलेली- अर्थात् शारीरिक व्याधी) ती आध्यात्मिक. बाह्य विश्वातील वस्तूंचा माणसाच्या इंद्रियाशी संयोग होऊन जी दु:खे भोगावी लागतात ती आधिभौतिक. म्हणजे कीटकदंश, अपघात, ग्रहदशा, शिक्षा, तुरुंगवास इ. मोठी यादी आहे. आधिदैविक म्हणजे केलेल्या पापामुळे वा दोषांमुळे भोगावे लागणारे ताप.

समर्थ आध्यात्मिक तापाचे वर्णन करतात–

‘देह, इंद्रिये आणि प्राण ।
यांचेनि योगे आपण ।
सुखदु:खे सिणे जाण।
या नाव आध्यात्मिक ।।१३।।
देहामधून जे आले ।
इंद्रिय प्राणे दु:ख जाले ।
ते आध्यात्मिक आता विशद केले ।
पाहिजे की ।।१५।।’ (दासबोध ३.६)

यानंतर पुढील ४० ओव्यांमध्ये श्री समर्थांनी आध्यात्मिक तापाखाली येणाऱ्या दु:खाचे वर्णन केले आहे. श्रीसमर्थांचे निरीक्षण किती सूक्ष्म होते आणि व्यवहार ज्ञान केवढे अवाढव्य होते, स्मृति किती विलक्षण होती हे पाहून घ्यावे. जवळजवळ २१० रोगांचे प्रकार त्यांनी सांगितले आहेत. शरिरशास्त्राचा आणि वैद्यक शास्त्राचा केवढा सखोल अभ्यास समर्थांचा होता हे पाहून मन थक्क होते. यामध्ये ते सांगतात–

‘उचकी लागली उसित गेला ।
पीत उसळले उलाट जाला ।
खरे पडसा खोकला ।
या नाव आध्यात्मिक ।।
उसळला दमा आणि धाप ।
पडजिभ ढासी आणि कफ ।
मोवाज्वर आणी संताप ।
या नाव आध्यात्मिक ।।’ (दासबोध ३.६)

**अशाच प्रकारचा त्रास या कोरोनामुळे सर्व जगाला सहन करावा लागत आहे** आणि सारे जग ‘हुताशन पेटला’ असे झाले आहे. परंतु नीट विचार केला तर **हा केवळ आध्यात्मिक ताप नाहीये तर आधिभौतिक ताप सुद्धा आहे.** समर्थ सांगतात–

‘सर्व भूतांचेनि संयोगे ।
सुखदु:ख उपजो लागे ।
ताप होता मन भंगे ।
या नाव आदिभूतिक ।।’ (दासबोध १.७.२)

आणि मग त्यांनी आग लागणे, चोरी होणे, मूर्ख मुलगा निपजणे, प्राण्यांनी दंश करणे, राजदंड होणे, पुरात सापडणे अशी ८० ओव्यांमधे या

तापांची यादी दिली आहे की ज्यामधे मनुष्य होरपळून जातो. **यात महत्त्वाचा मुद्दा असा की 'सर्व भूतांचेनि संयोगे' म्हणजे सृष्टीतील इतर घटकांशी संयोग झाल्यामुळे हा ताप निर्माण होतो. तसे आता हे जगजाहीर झाले आहे की चीनने हे विषाणू निर्माण केले,** जे अत्यंत घातक आणि जीवघेणे विषाणू, जे भल्याभल्या शास्त्रज्ञांना सुद्धा समजायला वेळ लागला आणि तोपर्यंत या कोरोनारूपी अजगराने साऱ्या जगाला विळखा घातला होता. वृद्धांपासून तान्ह्या बालकापर्यंत कोणाला त्याने सोडले नाही. घरातील अत्यंत आवडती व्यक्ती अचानक मरण पावू लागली. तिला बघता सुद्धा येईना, भेटता येईना. आपण पूर्वी साथीच्या रोगांची वर्णने ऐकायचो. प्लेगने एका घरातील चार-चार माणसे जायची. आज असे वाटत होते की वा! विज्ञानाने केवढी प्रगती केली! आता आपण खूप सुखी आहोत. सर्व रोगांवर औषधे निघाली आहेत! पण हा कोरोना आला आणि त्याने भल्याभल्यांची जिरवली. धन आहे तेव्हा मी त्याच्या जोरावर काहीही विकत घेईन, कोठेही फिरेन, विमानातून भटकेन, परदेशात सहलीला जाईन असे म्हणणाऱ्या सर्वांना या कोरोनाने एकांतवासाची शिक्षा तर दिलीच पण मृत्यूचा भोगदण्डसुद्धा दिला आणि आश्चर्य म्हणजे ज्यांचा जगाशी संपर्क नाही असे वनवासी, खेडेगावातील लोक त्यामानाने सुरक्षित राहिले. पुन्हा एकदा समर्थांच्या बोलाचा प्रत्यय आला–

'सरतां संचिताचें शेष। नाहीं क्षणाचा अवकाश।
भरतां न भरतां निमिष्य। जाणें लागे॥३॥
मृत्य न म्हणे बळाढ्य। मृत्य न म्हणे धनाढ्य।
मृत्य न म्हणें आढ्य। सर्वगुणे॥९॥
मृत्य न म्हणे हा विख्यात। मृत्य न म्हणे हा श्रीमंत।
मृत्य न म्हणे हा अद्भुत। पराक्रमी॥१०॥
मृत्य न म्हणे वित्पन्न। मृत्य न म्हणे संपन्न।
मृत्य न म्हणे विद्वज्जन। समुदाई॥१७॥
मृत्य न म्हणे शास्त्रज्ञ। मृत्य न म्हणे वेदज्ञ।
मृत्य न म्हणे सर्वज्ञ। सर्व जाणे॥२१॥
मृत्य न म्हणे योगाभ्यासी। मृत्य न म्हणे संन्यासी।
मृत्य न म्हणे काळासी। वंचूं जाणे॥२४॥
मृत्य न म्हणे बाळ तारुण्य।
मृत्य न म्हणे सुलक्षण।
मृत्य न म्हणे विचक्षण। बहु बोलिका॥३३॥
मृत्याभेणें पळों जातां। तरी मृत्य सोडिना सर्वथा।
मृत्यास न ये चुकवितां। कांहीं केल्या॥३८॥
मृत्य न म्हणे थोर थोर। मृत्य न म्हणे हरिहर।
मृत्य न म्हणे अवतार। भगवंताचे॥४०॥'

(दासबोध ३.९)

आता हा असा मृत्यूचा ढीग का बरं निर्माण झाला? **याचा अधिक सूक्ष्मात जाऊन विचार केला तर लक्षात येते की हा आधिदैविक ताप सुद्धा आहे.**

मानवी जीवनात अनेक अनादि समस्या आहेत. त्यापैकी एक अशी की, "हे जग कर्मभूमी आहे. जसे करावे तसे त्याचे फळ भोगावे हा येथील नियम आहे." पण प्रत्यक्ष जीवनात काय आढळते? शरीरशक्तीच्या किंवा द्रव्यशक्तीच्या किंवा दंडशक्तीच्या जोरावर माणूस धडधडीत अनीतीने व अन्यायाने स्वार्थ साधतो. त्याच्या वाईट कर्माचे फळ त्याला येथे मिळत नाही. हे असे का? या प्रश्नाचे उत्तर असे की, मनुष्य जे जे कर्म येथे करतो ते कधीही वाया जात नाही. केव्हातरी कोठेतरी त्या जीवाला त्याचे फळ मिळालेच पाहिजे. जर या जन्मात ते मिळले नाही तर मृत्यूनंतरच्या अवस्थेमध्ये ते मिळते खास. हा फळभोग अतींद्रिय असल्यामुळे श्री समर्थ असे विनवितात की मृत्यूनंतरच्या अवस्थांची शास्त्रांमधील वर्णने

काल्पनिक मानू नयेत. मृत्यूच्या पलीकडे काही तरी व्यवस्था आहे आणि तेथे या जगामध्ये केलेल्या कर्माचे उत्तर द्यावे लागते हे सुद्धा अगदी खरे आहे. शास्त्रामध्ये त्याला यमयातना असे म्हणतात. ज्याला परमार्थ हवा त्याने या जगातील आपल्या जीवनात सत्कर्मांनाच वाहून घेतले पाहिजे हे काय सांगायला हवे?

**हे समजावून घेतले की आधिदैविक ताप आपण कसा भोगतो आहोत हे लक्षात येईल. समर्थ सांगतात—**

‘शुभाशुभ कर्मानें जना। देहांतीं येमयातना।
स्वर्ग नर्क भोग नाना। या नाव आदिदैविक॥२॥
नीती सांडूनियां तत्वता। करूं नये तेंचि करितां।
येमयातना भोगितां। जीव जाये॥५॥
मातलेपणें उन्मत्त। जीवघात कुटुंबघात।
अप्रमाण क्रिया करीत। म्हणौन येमयातना॥७॥
ऐसी मर्यादा लाविली देवें।
म्हणौन नीतीनें वर्तावें।
नीती न्याय सांडितां भोगावें। येमयातनेसी॥१२॥
देवें प्रेरिले येम। म्हणौन आदिदैविक नाम।
तृतीय ताप दुर्गम। येमयातनेचा॥१३॥
नाना पुण्यें नाना विळास।
नाना दोषें यातना कर्कश।
शास्त्रीं बोलिले अविश्वास। मानूंच नये॥१८॥
उठवेना बैसवेना। रडवेना पडवेना।
यातनेवरी यातना। या नाव आदिदैविक॥२५॥
आध्यात्मिक आदिभूतिक।
त्याहूनि विशेष आदिदैविक।
अल्प संकेते कांहीयेक।
कळावया बोलिलें॥२९॥’

(दासबोध २.८)

**हे समर्थांचे निरूपण वाचल्यावर लक्षात येईल की कोरोना हा सुद्धा आधिदैविक ताप का आहे.** मानव धन-संपत्तीने उद्दाम झाला. सर्वच देशातील राजसत्ता ही आपलेच प्रभुत्व जगावर रहावे यासाठी वाट्टेल ते मार्ग अवलंबू लागली. सर्व राष्ट्रांमधे छुपी युद्धे होत राहिली. शस्त्र व अस्त्र यांचा अनिर्बंध वापर होऊ लागला. सोने आणि पेट्रोल याचा अवाजवी साठा केला गेला. जागतिक नियमांचे उल्लंघन केले जाऊ लागले. जी प्रगत राष्ट्रे आहेत ती एकमेकांवर कुरघोडी करू लागली. नीती, सदाचार, मैत्री, सौहार्द्र हे शब्द केवळ ग्रंथातच राहिले. राजकारण तर इतके गलिच्छ झाले की ‘निष्ठा’ शब्दाची ‘चेष्टा’ झाली. याचा भयावह परिणाम म्हणूनच कोरोनाचे भयानक संकट जगावर कोसळले. प्रसारमाध्यमे या भयानक संकटाचा सुद्धा गलिच्छ वापर करून टीआरपी वाढवण्याचा प्रयत्न करत आहेत. भारत देशापुरता विचार करायचा झाला तर पंतप्रधान मोदी एकाकी पण खंबीर झुंज देत आहेत. अंधारात तोच एक आशेचा किरण आहे.

या सर्वांना धडा शिकवण्यासाठीच परमेश्वराने हा छोटा प्रलय आपल्या वाट्याला दिला आहे. जनसामान्यांच्या वाट्याला हा भोग का? याचे उत्तर असे आहे की जनता निष्क्रीय राहाते. ‘आम्हाला काय त्याचे?’ किंवा ‘अरेरे! हे काय चालले आहे?’ एवढेच आपण म्हणतो.

धर्म म्हणजे नीतिमत्ता. पण धर्मांध समूह आक्रमणे करत असतानाही आपण निवांत राहतो. कलियुगात संघशक्ती फार महत्त्वाची असते. हे जाणूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अविरत कार्यरत आहे. परमेश्वर असा तडाखा देतो की आपण खडबडून जागे होतो. या कोरोनामुळे अशी जागृती आली आहे का नाही मला माहीत नाही, पण घरामधे राहून मन:शांतीसाठी का होईना लोक परमार्थाकडे वळले आहेत हे निश्चित.

विष्णुसहस्त्रनामामधे परमात्म्याची दोन भिन्न गुण सांगणारी अनेक विशेषनामे एकत्र आली आहेत.

**धाता, विधाता** – तोच धारण करतो व कर्मफले निर्माण करतो.

**प्रतर्दन, प्रभूत** – प्रलयकाळी संहार करतो, सद्गुणांची रेलचेल करतो.

**दुराधर्ष, कृतज्ञ** – ज्याचे नियमन करणे शक्य नाही, जो भक्तीने संतुष्ट होतो.

**रुद्र, बभ्रुः** – प्रलयकाळी संहार करताना सर्वांना रडवतो व बभ्रु म्हणजे सर्वांचे भरण-पोषण करतो.

**नियमो, यमः** – जगाला वागण्याच्या पद्धती सांगतो, यम म्हणजे प्रलयकाळी मृत्युरूप होतो.

**संप्रमर्दन, अहस्संवर्तक** – कालरूपाने मर्दन करणारा, सूर्यरूपाने दिवसाला प्रेरणा देणारा.

**विशिष्टः, शिष्टकृत्** – सर्वांपेक्षा वेगळा, शासन करणारा.

**क्रोधहा, क्रोधकृत् कर्ता** – संताप नष्ट करणारा, योग्य प्रसंगी रागावणारा.

**उद्भवः, क्षोभणः** – विश्वाच्या उत्पत्तीचे कारण, क्षोभ निर्माण करणारा.

**वीरबाहुः, विदारणः** – पराक्रमी, दुष्टांना विदीर्ण करणारा.

**सत्, असत्** – सत्यस्वरूप, अविद्या वा मायेने युक्त.

**भगवान्, भगहा** – ऐश्वर्य संपन्न, ऐश्वर्याचा उपसंहार करणारा.

**दारुण, द्रविणप्रद** – कठोर, धन देणारा

**दर्पहा, दर्पद** – उन्मत्तपणा नाहीसा करणारा, स्वाभिमान देणारा.

**अचल, चल** – स्थिर, वायुरूप गतिमान असा.

**भयकृत्, भयनाशनः** – भय उत्पन्न करणारा, भय नाहीसे करणारा.

**अपराजित्, सर्वसहः** – ज्याचा कोणी पराभव करू शकत नाही, सर्व काही सोसणारा.

**अक्षोभ्य, सर्वप्रहरणायुध** – ज्याला कोणीही क्षुब्ध करू शकत नाही, पण शत्रूचा नि:पात करणारी सर्व आयुधे ज्याने धारण केली आहेत असा.

विष्णुसहस्त्रनामात आणखीही एक विशेषण आहे **'वृद्धः'**. जगातील सर्वात वृद्ध, सर्वांचा तो पिता आहे. वडील जसे प्रसंगी रागावून मुलाला धपाटा घालतात तसा हा **परमात्मा प्रसंगी आपल्याला धडा शिकवितो. कोरोना हा त्याने घातलेला धपाटा व शिकवलेला धडा आहे.** तोच आता या संकटातून आपल्याला मुक्तही करेल. हा त्याने निर्माण केलेला छोटा प्रलय आहे असे समजावे. असे परस्परविरोधी गुण जगाच्या कल्याणार्थ तो एक ईश्वरच धारण करू शकतो.

या सर्व प्रकारच्या अशांतीतून तो परमात्मा व त्याने निर्माण केलेले अध्यात्म तारून नेऊ शकेल यावर आदित्यव्रतींचा शंभर टक्के विश्वास असायला हवा. तो परमात्मा घनीभूत होऊन आपल्या संतविद्यापीठात यावा यासाठी त्यालाच साकडे घालूया.

तोच 'सर्व' 'शर्व' आणि 'शिव' आहे.

शुभं भवतु!

* * *

**कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे हा जोड अंक व डिजिटल काढत आहोत.**

Subscribe to Aditya Pratishthan :


# आनंदवार्ता

**लवकरच प्रकाशित होत आहे**

## शङ्कर रामायण - अरण्यकाण्ड

(वाल्मीकि रामायणावरील मराठी ओवीबद्ध रचना)

'धन्य श्रीराम धन्य सीता । भारती धन्य रामकथा ।
ललाम संस्कृतीचे माथा । निरंतर ।।'




डबल डेमी सुमारे ६२५ पृष्ठे व ७६४० ओव्या

प्रकाशित दोन खण्ड

| शङ्कर रामायण | डबलडेमी पृष्ठे | ओवीसंख्या | देणगी मूल्य रुपये |
|---|---|---|---|
| १) बालकाण्ड - | ६५६ | ११,२५४ | ३५० |
| २) अयोध्याकाण्ड - | ९६८ | १५,९७२ | ८०० |

**आजच पृष्ठदान करा!**

शङ्कर रामायण अरण्यकाण्ड या ग्रंथाला आपण १०००/- रुपये पृष्ठदान करू शकता. ग्रंथामध्ये आपले नाव सानंद छापले जाईलच आणि हा ग्रंथ भेट म्हणूनही आपणाला मिळेल.

HDFC BANK : Hingane Bk. Branch, Sinhagad Road, Pune-51
**Aditya Pratishthan A/c No. 0825 111 000 0016** * IFSC : HDFC 0000825
कृपया पृष्ठदान देणगी जमा केल्याचे कळवावे. मोबाईल नंबर 8484921130

# श्री परशुराम – विष्णूंचा सहावा अवतार



**दि.१४ मे २०२१**
**अक्षय तृतीयेला**
**परशुराम जयंती**
**संपन्न झाली**
**त्यानिमित्त**
**विशेष लेख**

विष्णूच्या दशावतारांपैकी सहावा अवतार. जमदग्नी व रेणुका यांचा पुत्र. राम-कृष्ण यांची अवतारकृत्ये इतिहास-पुराणांतून विस्तृत प्रमाणावर आढळतात. मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह व वामन यांच्या नावांवर एकेक पुराण आहे; पण यांना मात्र पुराण नाही. यांच्या कथा राम-कृष्णांपेक्षा कमी; पण यांच्या पूर्वीच्या अवतारांपेक्षा जास्त आहेत. त्या रामायण-महाभारतातून व पुराणातून आलेल्या आहेत. भिन्न भिन्न पुराणातून परशुरामांविषयी जे काही लिहिलेले आहे, ते एकत्र संगतवार मांडल्यास यांचे चरित्र कळून येते, ते असे– .

**जन्म –** भृगुकुलोत्पन्न जमदग्नींचा आश्रम नर्मदेच्या तीरावर होता. तिथे एकोणिसाव्या त्रेतायुगात यांचा जन्म झाला. वैशाख शुद्ध तृतीया (अक्षय तृतीया) ही यांची जन्मतिथी होय. भृगुकुलोत्पन्न ऋचीक और्व हे परशुरामांचे आजोबा (पितामह) आणि जमदग्नी हे पिता होत. कान्यकुब्ज देशाचा राजा गाधी याची कन्या सत्यवती हिच्याबरोबर ऋचिकांचा विवाह झाला. सत्यवतीने स्वत:साठी एक आणि स्वत:च्या आईसाठी एक अशा दोन सुलक्षणी पुत्रांचे वरदान ऋचिकांजवळ मागितले. त्यानुसार श्रेष्ठ ब्राह्मणपुत्र प्राप्त होण्याचे वरदान ऋचिकांनी सत्यवतीला आणि श्रेष्ठ क्षत्रियपुत्र होण्याचे वरदान सत्यवतीचे मातेला (राजा गाधीचे पत्नीला) दिले. त्यासाठी त्यांनी दोन यज्ञीय चरू अभिमंत्रित करून दोघींना सेवनासाठी दिले. दुर्दैवाने सेवनाचे वेळी चरूंची नेमकी अदलाबदल झाली. सत्यवती घाबरली. तिने आपला पुत्र श्रेष्ठ ब्राह्मण आणि नातू क्षत्रियगुणयुक्त व्हावा, असे दुसरे वरदान ऋचिकांजवळ मागितले. उदार ऋचिकांनी सत्यवतीला तसे वरदान दिले. त्या वरदानाने सत्यवतीच्या पोटी महर्षी जमदग्नी जन्मले. पण सत्यवतीच्या आईने मात्र क्षात्रवृत्तीच्या विश्वामित्रांना जन्म दिला. त्याचप्रमाणे जमदग्नी आणि रेणुका यांचे पोटीही क्षात्रवृत्तीच्या परशुरामांचा जन्म झाला. थोडक्यात परशुरामांचा वंश असा आहे– भृगू-च्यवन-ऋचीक-जमदग्नी-परशुराम.

यांचे आजोबा ब्राह्मण व आजी क्षत्रिय होती. परशुरामांना रुमण्वत, सुषेण, वसु व विश्वावसू असे चौघे भाऊ होते. परशुराम सर्वांत धाकटे होत. पण या धाकट्याच्या हातूनच महान अघटित कृत्ये झाली.

महर्षी भृगूचे प्रपौत्र जमदग्नी द्वारा पुत्रेष्टी यज्ञ केला गेला. तेव्हा इंद्राने दिलेल्या वरदानामुळे

जमदग्नी-रेणुकेच्या पोटी यांचा जन्म झाला. हे स्थान मध्यप्रदेशातील इंदोर जिल्ह्यात मानपुरातील जानापाव पर्वतावर आहे, असे मानतात. हे विष्णूंचा आवेशावतार होत. ऋचिकांनी यांचे नाव राम ठेवले. जमदग्नीचे पुत्र म्हणून जामदग्न्य. शिवशंकराने दिलेला परशू धारण केला म्हणून हे परशुराम झाले. भृगू कुलोत्पन्न म्हणून भार्गव!

**शस्त्र व शास्त्र संपन्नता –** जन्मत:च हे तैल बुद्धीचे होते. उपनयनानंतर शालग्राम पर्वतावर जाऊन यांनी कश्यपांकडून मंत्रोपदेश घेतला. थोड्याच कालात यांनी सर्व विद्यांचे अध्ययन केले. त्यातल्या त्यात धनुर्विद्येवर यांची मोठी भक्ती होती, यांनी गंधमादन पर्वतावर तप करून शिवाला प्रसन्न करून घेतले व त्याच्याकडून धनुर्विद्या मिळविली.

शिवाकडून यांना अनेक अस्त्रेही प्राप्त झाली. यांना ब्राह्म, वैष्णव, रौद्र, आग्नेय, वासव, नैऋत इत्यादी एक्केचाळीस अस्त्रे शंकराकडून मिळाली. यांचा प्रसिद्ध परशूही त्यांनी शंकराकडूनच मिळवला. हे कसे दिसत, त्याचे वर्णन वाल्मीकि रामायण ग्रंथात केले आहे, ते पुढीलप्रमाणे–

'भीमकाय, जटावल्कलधारी आणि राजांचे मर्दन करणारा असा भार्गवकुलोत्पन्न जमदग्निपुत्र परशुराम दशरथ राजाने पाहिला. तो कैलासाप्रमाणे अपराजित होता. प्रलयकालीन अग्नीप्रमाणे दु:सह होता. तो तेजांनी तापत असल्यामुळे सामान्य जनांना त्याच्याकडे पाहणे अशक्य होते. त्याच्या खांद्यावर परशू होता व जणू विजेच्या लोळासारखे धनुष्यही होते. त्याच्या हातात तीक्ष्ण असा बाण होता. त्रिपुरांतक शिवासारखा तो दिसत असे.' (वा.रा. बाल. ७४.१७-१९)

**पित्याच्या आज्ञेचे पालन –** एकदा परशुरामांची आई रेणुका ही नदीवर पाणी आणायला गेली होती. त्याच वेळी तिथे चित्ररथ गंधर्व आपल्या स्त्रियांसह जलविहार करायला आला होता. त्याचे रूप आणि त्याचा तो विलास पाहून रेणुकेचे मन थोडेसे बावरले. ती थोडा वेळ तो जलविहार पाहत राहिली. थोड्याच वेळात भानावर येऊन तिने पाण्याची घागर भरून घेतली आणि ती लगबगीने आश्रमात परत आली. पण तिच्या मनाची चंचलता जमदग्नींना अंतर्ज्ञानाने आधीच कळली होती. त्याकाळी नीति-सदाचार मर्यादा अत्यंत कठोर होत्या. त्यामुळे त्यांनी तिला ठार करायचे ठरवले. त्यांनी एकामागून एक आपल्या चारही मुलांना रेणुकेच्या वधाची आज्ञा केली. पण त्यापैकी कोणीच त्या कामासाठी आपला हात उचलला नाही. परशुरामांनी मात्र पित्याची आज्ञा पाळली आणि मातेचा वध केला. यांचा तो आज्ञाधारकपणा पाहून जमदग्नी प्रसन्न झाले. त्यांनी 'वर माग' म्हणताच परशुरामांनी आईला जिवंत करण्याचा वर मागितला आणि जमदग्नींनी त्याप्रमाणे रेणुकेला पुनश्च सजीव केले.

**अवतार कार्य –** खरे पाहू जाता परशुरामांनी एकवीस वेळा पृथ्वी नि:क्षत्रिय केली, याचा अर्थ असा की माजलेल्या राजकुळांचा नि:पात परशुरामांनी केला. इतिहास असा घडला की, महर्षि भृगूंचे कुळ भार्गव या नावाने विख्यात आणि संपन्न होते. परंतु भार्गवांचा आत्यंतिक द्वेष हैहय राजा कार्तवीर्य करत असे. पश्चिम भारतात स्थायिक झालेल्या (गुजरात इत्यादी) भार्गवांना त्याने मध्य

प्रदेशात हुसकावून लावले. पण वैर संपले नाही. कार्तवीर्य आणि त्याच्या पुत्रांनी आश्रमात येऊन जमदग्नींचा वध केला आणि कामधेनूही पळवली. त्यावेळी परशुराम आश्रमात नव्हते. हैहय आणि भार्गव यांच्या दीर्घकालीन वैराचा आणि अन्यायाचा प्रतिशोध परशुरामांनी घेतला. प्रथम मल्लकी (आधुनिक माहूर, मातृतीर्थ) येथे जमदग्नींचा अंत्यसंस्कार केल्यावर परशुरामांनी कार्तवीर्य, त्याचे पाच पुत्र, हैहय कुळ आणि माहिष्मती नगरी यांचा संपूर्ण विनाश केला. उतल्या मातलेल्या बारा हजार अभिषिक्त राजांना परशुरामांनी कण्ठस्नान घातले. त्यांच्या रक्तांनी पाच कुण्डे भरली. कुरुक्षेत्रावर आजही ती कुण्डे 'समंतपंचकतीर्थ' (परशुरामह्रद्) या नावाने सुविख्यात आहेत.

वाल्मीकींनी त्यांना 'क्षत्रविमर्दन' न म्हणता 'राजविमर्दन' म्हटले आहे. त्यावरून असे म्हणता येते, की यांनी सरसकट क्षत्रियांचा संहार न करता दुष्ट-दुर्जन अशा क्षत्रिय राजांचा संहार केला. म्हणजे कृष्णावतारात कृष्णाने पांडवांना हाताशी धरून जे आणि ज्या प्रकारचे कार्य केले ते आणि त्याच प्रकारचे कार्य परशुरामांनी आपल्या अवतारात केले. वाल्मीकि रामायणात व रेणुकामाहात्म्यात अनेक ठिकाणी तसे स्पष्टच म्हटले आहे. (वा. रा. बालकांड सर्ग ७४ ते ७६, रेणुका. ४०.२७)

परशुरामांनी क्षत्रियसंहार केला, या घटनेमुळे वस्तुत: सगळ्या क्षत्रिय जाती त्यांच्या विरोधी असल्या पाहिजेत. पण वस्तुस्थिती तशी नाही. यांना दैवत मानणारी क्षत्रिय कुळे आजही आहेत. हिमाचल प्रदेशातले राजपूत लोक त्या परिसरात यांचे राज्य आहे असे आजही मानतात. याचा स्पष्ट अर्थ असा की माजलेल्या क्षत्रियांना मारून यांनी सज्जन, सात्त्विक राजघराण्यांचे रक्षण केले. चांगल्यात चांगले पीक प्रथम यांना अर्पण करावे, ही श्रद्धा आजही त्या भागात आहे. उत्तर प्रदेशात मुजफ्फराबादजवळ एक परशुराममंदिर असून, त्याच्या यात्रेसाठी तिकडील क्षत्रिय समाजही येत असतो. लमाण लोक स्वत:ला राजपूत समजतात. त्यांच्यातही परशुराम हे दैवत आहे. ते समूहाने पायी प्रवास करीत महेंद्रगिरीवर परशुरामांच्या यात्रेला जातात. अपरांतभूमीत (कोंकणात) यांनी अनेक क्षत्रिय कुळे आणून बसवली; त्यांचे तर परशुराम हे कुलदैवतच आहे.

यांची गणना सप्त चिरंजीवात केली जाते, अशी कल्पना आहे. पण मन्वंतराच्या वेळी हे आपल्या देहाचे विसर्जन करणार आहेत, असे महाभारतात सांगितले आहे–

'एवं शतगुणैर्युक्तो भृगूणां कीर्तिवर्धन: ॥
जामदग्न्यो ह्यतियशा मरिष्यति महाद्युति: ।'
(महा. द्रोण. ७०.२३-२४)

'अशा प्रकारे शंभर गुणांनी युक्त, भृगूंची कीर्ती वाढवणारा, महातेजस्वी व अत्यंत यशस्वी असा परशुराम मरणार आहे.'

केरळात यांचा शक चालू आहे. या शकाचे वर्ष सौर असून सिंहमासापासून त्याचा वर्षारंभ असतो. या शकाचे हजार वर्षांचे संवत्सर चक्र असून सांप्रत चौथे चक्र चालू आहे. त्याला कोल्लम शक असेही म्हणतात.

**परशुराम क्षेत्रे –** दक्षिणेत सह्याद्रीच्या अंतिम टोकाला तिरुवितांकुर जिल्ह्यात महेंद्रगिरी नावाचा डोंगर आहे. तेही परशुरामक्षेत्रच मानतात. त्या

ठिकाणी परशुरामाचे कायमचे वास्तव्य आहे, असे समजतात. ओडिसामध्ये महेंद्र पर्वत आहे, तिथेही एक परशुरामक्षेत्र आहे, असे म्हणतात. कृष्णा-वेण्णा संगमावरील खेड या गावाला पूर्वी परशुरामक्षेत्र म्हणत. गुजरातमध्ये भडोच जिल्ह्यात सहाव्या शतकातील भृगूचे देवालय आहे. ते स्थानही परशुरामाचेच मानतात. पंजाबात कांगडी जिल्ह्यामध्ये परशुरामाचे एक पुरातन मंदिर आहे. आसामच्या पूर्व सीमेवरील एका पर्वताच्या दरीतून ब्रह्मपुत्रा भारतात प्रवेश करते. परशुरामाने परशू फेकल्यामुळे ही दरी निर्माण झाली, अशी स्थानिक दंतकथा आहे.

वैतरणेपासून कन्याकुमारीपर्यंतची पश्चिम समुद्राची किनारपट्टी त्यानेच समुद्राकडून मिळवली आणि तेथे वसाहती उभारल्या, अशा कथा आहेत. त्यामुळे या भूमीत अनेक स्थळे परशुरामक्षेत्रे म्हणून ओळखली जातात.

सह्याद्रीच्या उत्तर टोकावर साल्हेरचा डोंगर आहे. तेथे एक मध्ययुगीन गड असून, त्याच्या एका टोकावर **परशुरामाचे मंदिर** आहे. मंदिराच्या उत्तरेस १०० हातांवर सामान्य मनुष्याच्या पावलांच्या चौपट आकाराची दोन पावले खोदलेली आहेत. बाण मारताना मनुष्य ज्या पवित्र्यात पावले ठेवील, त्या पवित्र्यात त्यांची योजना केलेली आहे. या ठिकाणी उभे राहून परशुरामाने समुद्रावर बाण मारला आणि समुद्र मागे हटवला, असे सांगतात.

**महाराष्ट्रातील परशुराम क्षेत्र –** चिपळूणपासून ८ कि.मी. वरील हे क्षेत्र आहे. परशुराम हा सप्त कोंकणांचा देव समजला जातो. एका डोंगरावर हे परशुरामाचे मंदिर आहे. हा डोंगर सुमारे एक हजार फूट उंच आहे. तेथे जो गाव वसला आहे, त्यालाही त्या देवस्थानामुळे परशुराम असेच म्हणतात. तिथल्या मंदिरात तीन मूर्ती काम, परशुराम व काल यांच्या मूर्ती ओळीने उभ्या आहेत. काम, परशुराम व काल अशी त्यांची नावे आहेत. काम शब्दाने ब्रह्मा, परशुराम शब्दाने विष्णु व काल शब्दाने शिव अशी ती तीन देवांची मांडणी आहे. परशुरामाची मूर्ती इतर दोहोंपेक्षा जरा अधिक उंच आहे.

इ. स. १६९८ साली ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर यांनी त्या मंदिराचा जीर्णोद्धार केला. शेजारी रेणुकेचे मंदिर बांधले. ब्रह्मेंद्रस्वामींच्या काळापर्यंत प्रस्तुत मंदिरात मूर्ती नव्हत्या. सगळे पूजोपचार तिथल्या शिलासनालाच समर्पिले जात. पुढे गुहागरच्या परचुरे नामक एका गृहस्थानी इथल्या मूर्ती घडवून त्यांची प्रतिष्ठापना केली. गेल्या काही वर्षात गर्भगृह नव्याने बांधले आहे.

येथील स्त्रिया परशुरामाच्या चरित्रावरच्या अनेक ओव्या गातात, त्यापैकी काही अशा–

वाजंत्री वाजती । बाणगंगेच्या धक्क्यावरी ।
परशुराम सख्यावरी । अभिषेक ॥
भार्गवराम देव । उभे कड्यावरी ।
निळ्या घोड्यावरी । स्वार झाले ॥
अक्षयतृतीयेला । उदयकुंभ द्यावा ।
मनांत स्मरावा । भार्गवराम ॥
अक्षयतृतीयेला । जन्मले परशुराम ।
मातेला मारुनी । पुरविती पितृकाम ॥
एकवीस वेळां । नि:क्षत्री केली धरणी ।
अद्भुत वाटे करणी । परशुरामाची ॥

प्रतिवर्षी अक्षय तृतीयेच्या दिवशी परशुरामाचा मोठा उत्सव येथे होत असतो. या डोंगरावर शिखराच्या बाजूला दत्तात्रेयाचेही छोटे मंदिर आहे.

**परशुराम स्मारक –** दापोली तालुक्यात लाडघर समुद्र किनाऱ्याजवळ डोंगर उतारावर असलेल्या बुरोंडी गावात अपरांत भूमीचे स्वामी असणाऱ्या श्री परशुरामांचे सुंदर स्मारक उभे केले आहे. हा परिसर गर्द हिरवाईने वेढेलला असून दूरवर दिसणारा लाडघर समुद्रकिनारा इथल्या सौंदर्यात अजून भर घालतो. पृथ्वीच्या गोलावर उभा असलेला कांस्यधातूप्रमामे दिसणारा भव्य पूर्णाकृती पुतळा उठून दिसतो.

जवळच लाडघर बीच, केशवराज मंदिर, दापोली, अंजर्ले बीच ही प्रेक्षणीय स्थळे आहेत. समुद्र सहा योजने मागे हटवून परशुरामांनी कोकणाची निर्मिती केली अशी कथा आहे.

**कोकणस्थ व परशुराम –** कोकणस्थांचा व परशुरामांचा जवळचा संबंध मानला जातो.

परशुरामाला समुद्र किनारी १४ आसन्न मरण माणसे मिळाली. त्यांना बरे करून त्यांची कोकणात स्थापना केली. मग त्यांना ब्राह्मणत्व दिले. म्हणून त्यांना कोकणस्थ असे नाव मिळाले. म्हणून चित्तपावन हे परशुरामाचे भक्त. या माणसांचा वर्ण गोरा होता. यावरून कोकणस्थांचा इतरांपेक्षा वेगळा गोरा रंग, सरळ नाक, घारे डोळे वगैरेचा तर्क लावता येतो.

हे स्थिरावलेले लोक शेती करत. ते वेदांचे अध्ययन व अध्यापन करत व इतर जातींचे पौरोहित्य करत. सतराव्या शतकात भट घराणे देशावर आले व बाळाजी विश्वनाथ शाहू महाराजांचा पंतप्रधान झाला. पुढे पटवर्धन, फडके, मेहेंदळे, गोखले, खाजगीवाले, रास्ते इत्यादी अनेक रणधुरंधर पुरुष नावाजले. राजकारणच नव्हे तर इतर क्षेत्रातही, वैदिक पंडित, ग्रंथकार, मुत्सद्दी, वकील, सावकार, व्यापारी वगैरेत त्यांी शिरकाव केला. नंतर इंग्रजी काळातही रानडे, टिळक, चिपळूणकर, आगरकर, सावरकर, कर्वे वगैरे अनेकांनी आपली कर्तबगारी दाखवली.

**देवधर्म –** प्रारंभी सर्व कोकणस्थ शैव होते. गुहागरचा वाडेश्वर, हरिहरेश्वर, कोळेश्वर, व्याघ्रेश्वर, वेळेश्वर, सोमेश्वर हे महत्त्वाचे कुलदेव. चित्पावन देवीचे उपासक नाहीत पण त्या चौदा ब्राह्मणांना परशुरामाने आंबाजोगाई येथे नेले. त्या देवीच्या प्रसादाने हे ब्राह्मण बरे झाले व त्यांचा वंश वाढू लागला. म्हणून कोकणस्थांचे कुलदैवत 'अंबेजोगाई' हे सुद्धा आहे. काही जण वाडेश्वर-जोगेश्वरी, सोमेश्वर-महालक्ष्मी, महादेव-जगदंबा अशी जोडकुलदैवते मानतात. काही कुळांत विष्णूची उपासना सुरू झाली. लक्ष्मी-नारायण, केशवराज, लक्ष्मीनृसिंह, लक्ष्मीकेशव ही कुलदैवते काही घराण्यांनी स्विकारली. याशिवाय खंडोबा, भवानी, त्र्यंबकेश्वर, गिरमाई, वेताळ, कालभैरव, व्यंकोबा यांनाही कुलस्वामीचे स्थान मिळाले आहे. काही घराण्यात जोगवा मागण्याचे व्रत पाळले जाते. या शिवाय जाखाई, केडजाई, करंजेश्वरी, नवलाई इत्यादी ग्रामदेवता पुजणारेही सापडतात.

**सण व उत्सव –** चैत्री पाडवा, नागपंचमी, नारळी पौर्णिमा, कृष्णजन्माष्टमी, गणेश चतुर्थी, नवरात्र, होळी व रंगपंचमी हे महत्त्वाचे सण. गणेशाचे महत्व पेशवाईपासून वाढले कारण पेशवे गणेशभक्त होते.

* * *



काळ, परशुराम, काम – क्षेत्र परशुराम, चिपळूण



परशुराम स्मारक - लाडघर (दापोली)

## श्री नृसिंह जयंती

### वैशाख शुद्ध चतुर्दशी

### दि. २५ मे २०२१

### नृसिंह मंदिर, सिंहाचलम्



आंध्रप्रदेशातील विशाखापट्टणम् जिल्ह्यातील सिंहाचलम् हे नरसिंह क्षेत्रांपैकी प्रसिद्ध क्षेत्र असून येथे नृसिंहाने प्रल्हादाचे रक्षण केले व हिरण्यकशिपूचा वध केला असे परंपरा मानते. ८०० फूट उंच टेकडीवर हे श्रीवराह लक्ष्मी-नृसिंह मंदिर आहे. भव्य गोपूर व सुंदर शिल्पकलेने नटलेले हे मंदिर तेराव्या शतकात बांधले गेले.



## कूर्मजयंती

### वैशाख पौर्णिमा

### दि. २६ मे २०२१

### श्रीकूर्मम् , भारतातील एकमेव कूर्ममंदिर!

आंध्रप्रदेशातील श्रीकाकुलम् जिल्ह्यातील हे प्रसिद्ध देवस्थान अत्यंत प्राचीन असून यात कासवाच्या रूपातील पाषाणमूर्ती आहे. कासवाची मूर्ती असलेले एकमेव मंदिर. दोन फूट लांब असलेली ही मूर्ती मस्तक व शरीर अशा दोन विभागात आहे. या मंदिरातील वातावरण मंगलमय असून श्वेत पुष्करिणीच्या काठावर असलेले हे मंदिर वास्तुशास्त्राचा उत्तम नमुना आहे.

## दि. १ एप्रिल २०२१

## गुरु तेगबहाद्दूर चतुःशताब्दी जयंतीनिमित्त



गुरु तेगबहाद्दूर

**गुरु नानकांनी इ. स. १५ व्या शतकात स्थापन केलेला, भक्ती-शक्ती यांचा समन्वय असलेला आणि अनुयायांमध्ये विजिगीषु वृत्ती असलेला शीख पंथ म्हणजे हिंदू धर्माचीच एक शाखा आहे. या पंथाच्या प्रत्येक गुरूच्या हातात खड्गरूप शक्ती होती, मस्तकात ज्वलंत राष्ट्रभक्ती होती आणि हृदयात परमात्म्याची प्रीतियुक्त भक्ती होती.**

**वस्तुतः गुरु नानक हे रामपुत्र लवाच्या वंशातील आहेत. बाबरापासून सर्व आक्रमकांनी पंजाबला पिळून काढले. यातून पंजाबला वाचवण्यासाठी गुरु नानकांच्या द्रष्टेपणातून शीख पंथ निर्माण झाला. भक्तीला शक्तीची जोड हे या पंथाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.**

शीख संप्रदायाचे नववे गुरु आणि गुरु हरिगोबिंदांचे तेजस्वी सुपुत्र.

**चरित्र –** यांचा जन्म दि. १ एप्रिल १६२१ या दिवशी अमृतसर येथे झाला. त्यांच्या आईचे नाव नानकी असे होते. शीखांचे सहावे गुरु हरिगोबिंद यांचे एकूण तीन विवाह झाले. नानकी ही त्यांची दुसरी पत्नी होय. बाबा गुरुदित्ता, आनिराय, बाबा आतल, तेगबहाद्दर आणि सुरजमल असे पाच पुत्र हरिगोबिंदांच्या पोटी जन्माला आले. यापैकी गुरुदित्ता हा सगळ्यात मोठा मुलगा अल्पायुषी ठरला. त्याला शीख संप्रदायाच्या गुरूपदी स्थापन करण्याचे हरिगोबिंदांच्या मनात होते. तो लवकर मृत्यू पावल्यामुळे त्याच्या मुलाला म्हणजे हरिराय या आपल्या नातवाला हरिगोबिंदांनी गुरूगादीवर बसविले. हरिराय सुद्धा तसा अल्पायुषीच ठरला. त्याचा पुत्र हरिकृष्ण हा तर वयाच्या आठव्या वर्षीच स्वर्गवासी झाला. त्यामुळे योगायोग असा की हरिकृष्ण या हरिगोबिंदांच्या पणतूकडे गेलेले गुरूपद पुन्हा एकदा हरिगोबिंदांच्या मुलाकडे म्हणजे तेगबहाद्दूरकडे आले. हा लहानपणापासूनच अत्यंत शांत स्वभावाचा आणि विरागी वृत्तीचा होता. पुढे याचा विवाह गुजरी नावाच्या सत्पात्र तरुणीबरोबर झाला. या दोघांच्या पोटीच शीख संप्रदायाचे शेवटचे गुरु 'गुरु गोबिंदसिंह' जन्मले.

हरिकृष्णने आपल्या मृत्यूसमयी 'बाबा बकाला' एवढेच शब्द उच्चारले होते. हे यावेळी बकाला गावी होते. यांचे मूळचे नाव 'त्यागमल' होते असे म्हणतात. तलवार चालवण्यात हे अत्यंत प्रविण असल्यामुळेच यांचे नाव तेगबहाद्दूर असे पडले. पुढे यांनी आपला मुक्काम बकाला या गावामध्ये

केला. शीख संप्रदायाच्या गुरूपदाचा लोभ यांच्या मनात अजिबात नव्हता. स्वत: गृहस्थाश्रमी असूनही अत्यंत विरक्त वृत्तीने बकाला येथे हे राहत होते. शीखांचा आठवा गुरु हरिकृष्ण वयाच्या आठव्या वर्षीच मृत्यू पावल्यानंतर नवव्या गुरूच्या शोधासाठी अनेक शीख 'बकाला' गावाकडे निघाले. आपल्याला गुरूगादी मिळावी म्हणून 'सोडिखत्री' जमातीतील सुमारे बावीस लोकांनी आपणच गुरु आहोत असे सांगण्याला प्रारंभ केला. त्यामुळे खरा गुरु कोण असा प्रश्न पडून गोंधळ निर्माण झाला.

परंतु हा पेचप्रसंग माखनशाह नावाच्या व्यापाऱ्यामुळे सुटला. हा व्यापारी आपल्या जहाजासह समुद्रावर असताना प्रचंड वादळ झाले. या संकटातून आपली सुटका झाल्यास आपल्या गुरूला पाचशे नाणी देण्याची माखनशाहने प्रतिज्ञा केली. सुदैवाने वादळातून याची सर्व जहाजे सुखरूपपणे किनाऱ्याला लागली. माखनशाह तातडीने बकाला गावात आला. बकाला येथे आल्यावर स्वत:ला गुरु म्हणणाऱ्या बावीस जणांना माखनशाहने प्रत्येकी दोन नाणी दिली. परंतु याच्या मनातले कुणालाच ओळखता आले नाही. शेवटी माखनशाह तेगबहाद्दरांकडे आला आणि केवळ पाचच नाणी त्याने यांच्यापुढे ठेवली. त्याबरोबर हे हसले आणि 'गुरूला सोन्याची पाचशे नाणी देण्याच्या तुझ्या संकल्पाचे काय झाले'? असा प्रश्न यांनी विचारला. यांच्या ठायी अलौकिक आध्यात्मिक सामर्थ्य आहे हे जाणून माखनशाह हर्षनिर्भर झाला. त्याने गुरुचरणांवर पाचशे सुवर्णमोहरांची रास ओतली पण घराच्या गच्चीवर जाऊन माखनशाहने झेंडा फडकविला. सगळ्या गावाला त्याने उंच स्वरात सांगितले, 'हा पहा तुमचा गुरु येथे आहे.' मग सर्व शीखांनी यांनाच गुरुगादीवर बसविले आणि यांच्या नावाचा जयजयकार केला.

**गुरुगादीवर –** गुरुगादीवर बसल्यानंतर त्या गादीखाली किती काटे आहेत याची कल्पना आली. कारण धीरजमल या यांच्या भावानेच याला विरोध करण्यास सुरुवात केली. धीरजमल हा गुरुदित्ताचा सगळ्यात मोठा मुलगा! त्याने काही मसंदांच्या मदतीने यांच्याशी संघर्ष करण्यास प्रारंभ केला. मसंदांच्या मदतीने धीरजमलने यांच्या घरावर हल्ला करून ते लुटून फस्त केले. माखनशाह आणि अन्य शिष्यांनी धीरजमल व त्याच्या मसंदांना पराभूत करून याच्यासमोर हजर केले. परंतु यांनी लुटीचा कोणताही भाग परत घेतला नाही. उलट घरातील उरलेले सर्व घेऊन जाण्याची विनंती धीरजमलला केली. शरमेने धीरजमलची मान खाली गेली.

काही दिवसानंतर हे अमृतसरला आले. वाटेत असंख्य शिष्यांनी यांचे दर्शन केले. परंतु अमृतसर येथे आल्यावर यांना हरिमंदिरात (हरमंदर) प्रवेश मिळाला नाही. भ्रष्ट मसंदांनी त्या पवित्र जागेचा ताबा घेतला होता. शेवटी हे आपल्या वडिलांच्या कीरतपूर या गावी आले. तेथेही मत्सरी भाऊबंदांनी आणि भ्रष्ट मसंदांनी यांना नाना प्रकारे त्रास दिला. सोढी खत्री जमातीचे लोकही यांच्या विरुद्ध होते.

मग मात्र यांनी वेगळाच विचार केला. कहलूरच्या राजाकडून शिवालिक पर्वतराजीत यांनी मोठी जागा मिळवून स्वतंत्र नगर वसविले. तेच पुढे आनंदपूर या नावाने ख्यातनाम झाले. यांच्या वडिलांच्या गावापासून सुमारे सहा किलोमीटर अंतरावर हे तीर्थक्षेत्र वसले आहे. आनंदपूर चहुअंगाने वाढत असतानाच हे शीख संप्रदायाच्या प्रसारासाठी पूर्वेकडे निघाले.

**संप्रदाय प्रसार –** दिल्ली, आग्रा, अलाहाबाद, पाटणा असा प्रवास करून ते आसामात पोचले. परंतु यांच्या पत्नीचा प्रसूतीकाळ धामधुमीचा होता. छत्रपति शिवाजी महाराजांनी अत्यंत चातुर्याने आग्र्याच्या कैदेतून आपली सुटका करून घेतली.

औरंगजेबाने या सर्व घटनेचा राग जयसिंग व त्याचा मुलगा रामसिंग यांच्यावर काढला. रामसिंगाला त्याने आसामच्या मोहिमेवर रवाना केले. अहोम राजांना त्याने पराभूत तरी करावे किंवा युद्धात स्वत: मरावे असा औरंगजेबाचा डाव होता.

यांचा मुक्काम यावेळी धूबरी येथे होता. असे म्हणतात की अहोम राजे व रामसिंग यांच्यात समेट घडवून आणण्याचा प्रयत्न यांनी केला. आज या गावी मोठा गुरुद्वारा आहे. यावेळी पौष शुद्ध सप्तमीला (इ. स. १६६६) शके १५८८ मध्ये यांची पत्नी प्रसूत झाली आणि तिने एका नररत्नाला जन्म दिला. हेच शीखांचे दहावे गुरु गोबिंदसिंह होय. पुत्र जन्माची वार्ता ऐकून हे पाटण्याला परतले. पुत्रमुख पाहून त्यांना हर्ष झाला. परंतु पंजाबमध्ये अजूनही अत्यंत अस्थिर वातावरण असल्यामुळे पत्नी व मुलाला मागे ठेवूनच हे पंजाबात आनंदपूर येथे परतले. यांच्या शिष्यांनी यांचे प्रचंड स्वागत केले. काही काळानंतर यांनी कुटुंबियांनाही पाटण्याहून आनंदपूर येथे आणले.

**आत्मबलिदान –** यावेळी औरंगजेबाचे धर्मवेड हिंदूंना पराकोटीचे जाचक ठरले होते. काश्मीरातील पंडितांची आणि हिंदूंची सरसकट कत्तल करण्याचा हुकूम त्याने दिला होता. भयभीत झालेले काही काश्मिरी हिंदू यांच्याकडे आले आणि धर्मांतराच्या संकटातून स्वत:ला वाचविण्याची विनंती यांना केली. हे म्हणाले,

‘या कामासाठी कोणा मोठ्या व्यक्तीची आवश्यकता आहे.’

त्यावेळी यांचा मुलगा गोविंदसिंह म्हणाला,

‘बाबा, तुमच्याहून दुसरा कोण बरे मोठा आहे?’

मुलाचे हे उत्तर ऐकून आपल्या बलिदानाची वेळ जवळ आलेली आहे हे यांनी ओळखले. सर्वप्रथम यांनी गोबिंदसिंहाला गुरुगादीवर बसवून शीखांचा दहावा गुरु म्हणून घोषित केले. मग हे दिल्लीला निघाले. यांच्या बरोबर भाई मतिदास, भाई दयाळ आणि सतिदास असे काही शिष्य होते. दिल्लीमध्ये आल्याबरोबर औरंगजेबाने यांना कैद करून तुरुंगात टाकले. ‘धर्मांतर करा. अन्यथा तुम्हाला हालहाल करून मारण्यात येईल’ अशी धमकीही देण्यात आली. परंतु यापैकी कोणीही प्रलोभनाला बळी पडले नाही किंवा धमकीला घाबरलेही नाही. असे म्हणतात की भाई मतिदासाला चिरून त्याचे दोन तुकडे करून मारण्यात आले. भाई दयाळला उकळत्या तेलात फेकण्यात आले आणि भाई मतिदासला जिवंत जाळण्यात आले हे सर्व यांच्या डोळ्यासमोर घडले. यांनीही आपल्या बलिदानाची तयारी केव्हाच केली होती.

‘तू जर खरा गुरु असशील तर चमत्कार करून दाखवशील’, असे औरंगजेबाने यांना सांगितले, परंतु यांनी ते नाकारले. मग यांच्या वधाचा हुकूम काजीने दिला. दिल्ली येथे चांदणी चौकात यांना आणण्यात आले आणि दिनांक ११ नोव्हेंबर १६७५ या दिवशी जलालउद्दीन नावाच्या सेवकाने यांचे मस्तक धडावेगळे केले. असे म्हणतात की या घटनेनंतर दिल्लीत प्रचंड वादळ झाले. गुरूच्या मृतदेहाला हात लावण्याचे धाडस कोणातच नव्हते. शेवटी ‘जैता’ या नावाच्या एका शीखाने यांचे मस्तक उचलून आनन्दपूरला आणले. दुसरा भाई लाखिशाह या नावाचा एक शीख दिल्लीत होता. त्याची दिल्लीच्या कोतवालीत ओळख होती. गुरूंचे उरलेले शरीर घेऊन त्याने त्याच्यावर उत्तरक्रिया केली. यांचे मस्तक धडावेगळे केले गेले म्हणून या जागेला आजही ‘शिशगंज’ असे म्हणतात. ज्या ठिकाणी यांची उत्तरक्रिया करण्यात आली तेथे आज ‘रकबगंज’ या नावाचा गुरुद्वारा उभा आहे. आपल्या वडिलांच्या हौतात्म्याचे वर्णन करताना गुरु गोबिंदसिंह म्हणतात, ‘गुरु तेगबहादूरच्या हौतात्म्याला या जगात तोड नाही. हे मृत्यू पावल्यानंतर पृथ्वीवर

सगळ्यांना दु:ख झाले, परंतु स्वर्गात मात्र आनंदी-आनंद उसळला.'

आपल्या 'विचित्र नाटक' या ग्रंथात गोबिंदसिंहांनी म्हटले आहे, 'सिर दिया, सर न दिया' म्हणजे गुरु तेगबहाद्दरांनी आपले मस्तक दिले परंतु सत्त्व मात्र दिले नाही. यांनी आपल्या आयुष्यात जे केले, त्यापेक्षा अनंत पटीने केवळ आत्मबलिदानाने केले. सगळा पंजाब याच्या आत्मबलिदानामुळे पेटून उठला. आणि गुरु गोबिंदसिंहांच्या नेतृत्त्वाखाली शीखांनी स्वातंत्र्याचा झेंडा फडकविला.

**जीवनरहस्य –** हे तलवार चालवण्यात स्वत: अत्यंत प्रवीण होते. साहसी होते. परंतु यांचे हृदय मात्र क्षमाशील होते. आयुष्याची सुमारे वीस वर्षे यांनी बकाला येथे जणू अज्ञातवासात घालविली. हे सदैव ध्यानामध्ये मग्न असत. धर्मग्रंथाचा आणि तत्त्वज्ञानाचा यांनी सखोल अभ्यास केलेला होता. दिल्लीला जाण्यापूर्वी यांनी आपल्या शिष्यांना जो संदेश दिला त्यात यांच्या जीवनाचे अवघे रहस्य प्रतिबिंबित झाले आहे. 'भौतिक जगताची कोणीही आसक्ती ठेवू नये. सुख-दु:ख, फायदा-तोटा या सर्व गोष्टी म्हणजे ईश्वराचीच इच्छा आहे असे समजावे. आपल्या स्वकर्तव्याला कोणीही चुकू नये, ईश्वराचे ध्यान करावे, ईश्वराच्या नामजपानेच मुक्तीचा लाभ होतो. प्रत्येकाने ईश्वराला स्मरावे, गरीब आणि गरजूंना मदत करावी आणि प्रत्येकाची भाषा गोड आणि नम्र असावी.'

**चिंतन –** यांच्या चिंतनाचा मुख्य गाभा उपदेशात्मक आहे. यांच्या उपदेशाचे सार असे आहे,

'हृदयातील मत्सर-द्वेष काढून टाका. वासना, क्रोध, दुष्टांची संगती यांचा पूर्ण त्याग करा. तुमच्या अंतर्मनातील पापांची जळमटे काढून टाका. ईश्वराचाच सदैव आश्रय करा. ईश्वराला सदैव स्मरा. भौतिक आकर्षणांना भुलू नका. तुमच्या आयुष्याचा एकेक क्षण प्रत्येक श्वासागणिक कमी होतो आहे. बालपण निरागसपणात जाते. तारुण्य भोगात सरते. वय वाढले की वार्धक्याचा त्रास सुरू होतो. त्यावेळी तुमचा रक्षणकर्ता कोण आहे? ज्याने तुम्हाला हे आयुष्य दिले, त्यालाच तुम्ही विसरता कसे? त्याला शोधण्यासाठी जंगलात जाण्याची आवश्यकताच नाही. तो तुमच्या हृदयात आहे. त्याला शोधा. फुलातील गंधाप्रमाणे तो तुमच्यातच आहे. बाह्य जगतात आणि अंतरंगात सर्वत्र तोच भरलेला आहे.'

'सत्याचा शोध घ्या. भोवतालचे जग क्षणभंगुर आहे, याचा विवेक करा. जग वाळूच्या भिंतीप्रमाणे आहे. केव्हा कोसळेल, ते सांगता येणार नाही. तुमच्या शरीरातील प्राण गेला की अर्ध्या तासात तुमचे कलेवर आप्तेष्ट पोचवतात. जीवनातील साथसंगत ही अशी असते. जगाचे प्रेम बेगडी असते. स्वार्थासाठी सर्वजण आपल्यावर प्रेम करतात. पत्नी असो वा मित्र! प्रीतीमागे स्वार्थ असतो. हे कटु आहे, पण सत्य आहे. म्हणून माया त्यागा. ईश्वराला शरण जा. भौतिक सुखे असत्य आहेत, हे जाणून घ्या. ज्या संपत्तीचा तुम्हाला गर्व वाटतो, ती संपत्ती स्वप्नवत् आहे. विषयांच्या मागे धावू नका. वडील, आई, पुत्र, पत्नी, भाऊ, बहीण, संपत्ती, मालमत्ता– सगळे आपले आहे, असे वाटते. पण यातले तुमच्याबरोबर काय येणार आहे? परमेशाला शरण जा.'

ईश्वराच्या भक्तीचा उपदेश केलेले यांचे एक सुंदर पद आहे,

'रे मन, राम सिउ करि प्रीति ।

स्रवन गोबिंद गुनु सुनउ अरु गाउ रसना गीति॥

करि साध संगति सिमरु माधो होहि पतित पुनीत ।

काल-बिआलु जिउ परिओ डोलै मुखु पसारे मीत ॥

आजु कालि फुनि तोहि ग्रसिहै समझि राखउ चीति ।

कहै नानकु राम भजि लै जातु अउसरु बीति।।'

(राग सोरठि) (श्री. गु. ग्रं. सा. २, पृ. ७७०).

जगन्नियंत्या ईश्वराला शरण जाऊन हे म्हणतात,

'परमेशा! माझ्या हृदयाच्या वेदना मी कोणाला सांगू? लोभीपणामुळे मी वित्तेषणेमागे धावलो. सुखासाठी अनंत दु:खे सोसली. मानवाची चाकरी अकारण केली. एखाद्या कुत्र्याप्रमाणे मी दारोदार भटकलो. तुझा विचार केला नाही. मी व्यर्थच जन्मलो.'

शरणागतीचे करुण चित्र या पदात उमटले आहे. ('तुझा दास मी व्येर्थ जन्मासि आलो' असे समर्थ रामदासांनीही करुणाष्टकात म्हटले आहे.)

ईश्वराच्या असीम कृपेचे वर्णन यांनी गजेंद्रमोक्ष कथेद्वारा केले आहे, हे विशेष! (राग रामकली). (श्री. गु. ग्रं. सा. ३, पृ. ४७१, ४७२).

'नाम रहिओ, साधू रहिओ, रहिओ गुरु गोविंद।' - हेच यांचे निरंतर मागणे आहे.

ईश्वराच्या नामजपाने प्रत्येकाने आत्मोद्धार करावा, हाच यांनी केलेला साररूप उपदेश आहे,

'बल होया बंधन छुटे सब किछु होत उपाय।
सब कुछ तुमरे हात में तुम ही होत सहाय।।'

परमेश्वरच साहाय्यक आहे हे सांगताना हे म्हणतात,

'हरि बिनु तेरो को न सहाई ।
का की मात पिता सुत
बनिता को काहू को भाई ।।१।।रहाउ ।।

धनु धरनी अरु संपति सगरी जो मानिओ अपनाई ।

तन छूटै कछु संगि न चालै कहा ताहि लपटाई ।।१।।

दीन दइआल सदा दुख भंजन ता सिउ रुच न बढ़ाई ।

नानक कहत जगत सभ मिथिया जिउ सुपना रैनाई ।।२।।'

(रागु - सारंग) (श्री. गु. ग्रं. सा. ४, पृ. ३२८).

'हे जीवा, परमेश्वराशिवाय तुझा साहाय्यक कुणी नाही. आई-वडील, मुलगा, बायको कुणाचे झाले आहेत? कोण कुणाचा भाऊ आहे? पैसा, जमीन-जुमला ही सर्व संपत्ती जिला तुम्ही आपली समजता ती मृत्यूसमयी बरोबर येत नाही. म्हणून तिला चिकटून राहण्यात काय अर्थ आहे? दु:खे दूर करणाऱ्या दयाळू परमेश्वराविषयी भक्ती वाढवली नाही तर हे मिथ्या जग रात्रीच्या स्वप्नासारखे असार आहे.'

**एका दृष्टिक्षेपात –**

जन्म : १ एप्रिल १६२१

जन्मस्थान : अमृतसर, पंजाब

मातापिता : पिता - गुरु हरिगोबिंद, माता - नानकी

गुरुगादीची प्राप्ती : २० मार्च १६६५

वाणी : १५ रागांमध्ये रचना, आसा, सोरठि, टोडी, मारु, रामकली तसेच गाऊडी रागांमधे रचना.

संदेश : अनासक्ती आणि त्याग यांचा संदेश

योगदान : १) धर्माच्या रक्षणासाठी हौतात्म्य स्वीकारले.

२) 'आनंदपूर'साहिब नावाचे नगर पंजाबमधे वसवले.

३) उत्तर प्रदेश, बिहार, बंगाल, आसाम इ. ठिकाणी धर्म स्थिर होण्यासाठी अनेक दौरे.


उत्तराधिकारी : गोबिंदराय या स्वत:च्या पुत्राला उत्तराधिकारी केले.

महानिर्वाण : ११ नोव्हेंबर १६७५, ५४ व्या वर्षी, दिल्ली येथे 'वीरगती' मिळाली.

* * *

आपल्या संग्रही हे ग्रंथ हवेतच!

## ।। श्रीगणपति अथर्वशीर्ष ।।




(आठवी आवृत्ती)

गुरुदेव
**शंकर अभ्यंकर**
लिखित




पृष्ठसंख्या
१६ + ४१६ = ४३२
(डबल क्राऊन)

देणगी मूल्य रु. ५००/-
सवलत देणगी मूल्य रु. ३५०/- मात्र

आदित्य प्रतिष्ठान

गेली अनेक वर्षे सर्वाधिक मागणी असलेल्या
गुरुदेव **शंकर अभ्यंकर** लिखित
**पसायदान** ग्रंथाची
दहावी आवृत्ती आता प्रकाशित

पृष्ठसंख्या
आठ + ३९२ = ४०० (सिंगल डेमी)




आदित्य प्रतिष्ठान

देणगी मूल्य रु. ३००/-
सवलत देणगी मूल्य रु. २१०/-

संपर्क : आदित्य प्रतिष्ठान, प्लॉट १५, वेदान्तनगरी सोसायटी, ४, कर्वेनगर, पुणे-४११ ०५२
दूरभाष : 020-25445171 ● मोबाईल : 8484921130 ● E-mail : aditya.pratishthan25@gmail.com

# संतभारती क्षणचित्रे

**कोरोना कालखण्डातही संतभारतीचे काम थांबले नाही. ४० हजार स्क्वे. फूटावर मंदिर आणि प्रदर्शनाच्या पायाभरणीचे काम अविरत चालू आहे. त्याची क्षणचित्रे**










।। श्री ।।



# विनम्र आवाहन

आदित्य प्रतिष्ठान या सार्वजनीन न्यासाची (नोंदणी क्र. ई ८५१) स्थापना गुरुदेव शंकर अभ्यंकरांनी दि. १४ एप्रिल १९८३, गुढी पाडव्याचे मंगल दिनी केली. लोकशिक्षण आणि भारतीय संस्कृती रक्षण-संवर्धन या दोन प्रधान उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी बहुआयामी, लोककल्याणकारी कार्यक्रमांच्या माध्यमातून आदित्य प्रतिष्ठानने गेल्या ३८ वर्षात लक्षणीय कामगिरी केली आहे.

भारताबरोबरच अमेरिका, इंग्लंड, युरोप, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, दुबई इत्यादी स्थळी दहा हजाराहून अधिक प्रवचने, २५००० पृष्ठांच्या सत्तर ग्रंथांचे प्रकाशन (त्यात पंचखण्डीय बृहद् भक्तिकोश, गीतासागर, महाराष्ट्र संतमालिका इ. ग्रंथ विशेष), देशात-परदेशात अठरा तीर्थ पर्यटन यात्रा शिबिरे, प्रवचने-व्याख्याने-कीर्तने यांच्या माध्यमातून अखंड समाज-प्रबोधन आणि जनजागरण, १८ दिवसांचे गीतायज्ञ, १०० हून अधिक विषयांवरील दृक्-श्राव्य सी.डी. व पेन ड्राईव्हज्, भारतरत्न पं. भीमसेन जोशी, भारतरत्न लता मंगेशकर इत्यादींना अत्यंत मानाचा लक्ष्मी-वासुदेव पुरस्कार, आदित्य मंडळ युवक मंच - अशी प्रतिष्ठानची बहुरंगी व भरीव कामगिरी आहे.

प्रतिष्ठानचा विस्तार जगभर व्हावा या प्रयत्नातून प्रतिष्ठानला FCRA हे प्रमाणपत्र मिळाले. त्यामुळे प्रतिष्ठानला कोणत्याही चलनामधील देणग्या स्वीकारता येतात. त्याहीपुढे जाऊन अमेरिकेमध्ये आता २०१७ या वर्षी 'Aditya Pratishthan Inc' या नावाने प्रतिष्ठानच्या शाखेची स्थापना झाली. त्यामुळे परदेशस्थ बांधव आता येथे देणगी जमा करू शकतात. त्या बँकेचा तपशील खाली दिला आहे. नियमित ११ डॉलर या खात्यामधे जमा करू शकता. 501 (C) (3) मुळे तेथेही कर सवलत मिळू शकते.

आता लोणावळ्याजवळ ३३ एकरांच्या विस्तीर्ण भूमीवर आदित्य प्रतिष्ठान विशाल सांस्कृतिक-शैक्षणिक प्रकल्प उभारते आहे. त्यापैकी महाविष्णू मंदिर संकुलाच्या ४०,००० चौ. फू. च्या अधिष्ठान उभारणीला वेगाने प्रारंभ झाला आहे. या संकुलात मंदिर, विशाल सभामंडप, वेद पाठशाळा, यज्ञशाळा, योग केंद्र, प्रदर्शनांची चार विशाल सभागृहे, सुंदर पुष्करिणी इत्यादी विविध गोष्टींचा समावेश आहे. महाविष्णू मंदिराच्या संकुलाच्या उभारणीसाठी आपली उदार देणगी आदित्य प्रतिष्ठान या नावे पाठवावी, अशी विनम्र प्रार्थना आहे.

**आदित्य प्रतिष्ठानच्या देणग्यांना ८० जी अन्वये आयकरातून सवलत आहे.**

**संपर्क**

१) **आदित्य प्रतिष्ठान,**
१५ वेदान्तनगरी सोसायटी,
स. नं. ४, कर्वेनगर, पुणे-४११ ०५२
दूरभाष : 020-25445171
मोबाईल : 8484921130

२) **सौ. विशाखा बिळगी**
९७, कृष्णकुंज, फ्लॅट नं. ५, रानडे रोड,
दादर, मुंबई-४०० ०२८.
मोबाईल : 09619565381

३) **डॉ. सौ. उमा मोघेकर**
बंगला नं. ९, रामकृष्णनगर,
पूर्व द्रुतगती मार्ग, ठाणे-४०० ६०४.
मोबाईल : 09833567664

**HDFC BANK**
Hingane Bk. Branch,
Sinhagad Road, Pune-51
**Aditya Pratishthan**
**A/c No.**
**0825 111 000 0016**
IFSC : HDFC 0000825

**STATE BANK OF INDIA**
Karve Nagar Branch,
Pune-411 052
**Aditya Pratishthan**
**A/c No.**
**34969528266**
IFSC No. : SBIN0013530

**परदेशस्थ बंधू-भगिनींसाठी**
**FCRA No. : 083930512**
**Aditya Pratishthan Inc. USA**
**No. 501 (C) (3) No. 17053228327007**
**CHASE BANK A/c No. : 287576612**

## श्रद्धांजली


भानुदास विद्वांस
(आण्णा)

प्रतिष्ठानचे निष्ठावंत कार्यकर्ते श्री. आण्णा विद्वांस यांचे दि. ९ एप्रिल २०२१ रोजी वयाच्या ८८ व्या वर्षी दु:खद निधन झाले. प्रतिष्ठानच्या प्रत्येक यात्रेला व शिबिराला ते आवर्जून उपस्थित असत. आण्णांची नियमित गुरुदेवांचे कौतुक करणारी पत्रे येत असत. त्यांना सर्वांच्या वतीने विनम्र श्रद्धांजली. या निमित्ताने त्यांची कन्या माधुरी जोशी यांचे मनोगत


आमचे आण्णा – जन्म दि. ९-२-१९३३ - मृत्यू दि. ९-४-२०२१

आण्णांसाठी लिहायचे ठरवले आणि अनंत आठवणींनी मन भरून गेले. आण्णा उत्तम शिक्षक होते. पत्रलेखन हा त्यांचा आवडता छंद होता. ते अतिशय सुरेख पत्र लिहित असत व अक्षरही नीटनेटके. घरी आलेल्या कुणालाही विन्मुख जाऊ देत नसत. सदैव मदतीसाठी तत्पर होते. नोकरी संभाळून ते व्यवसाय करत असत. पण आपल्या तत्त्वांशी त्यांनी कधी तडजोड केली नाही. जीवनात अपार कष्ट व संघर्ष त्यांनी आमच्यासाठी केला. यात त्यांना माझ्या आईनेही उत्तम साथ दिली. अत्यंत धार्मिक असल्याने खूप तीर्थयात्रा केल्या. त्यांची दत्त महाराजांवर अपार भक्ती होती, त्यामुळे ते सातत्याने नरसोबाच्या वाडीला जात असत.

या त्यांच्या जीवन प्रवासात त्यांना गुरुदेवांचा परिसस्पर्श लाभला आणि त्यांचे जीवन गुरुदेवमय झाले. हे आम्ही नित्य अनुभवत होतो. त्यांना गुरुदेवांविषयी आदर तर होताच पण खूप जास्त प्रेम आणि भक्ती होती. ते शेवटपर्यंत गुरुदेवांची प्रवचने, कीर्तने ऐकत असत. संत विद्यापीठ व्हावे असे त्यांना फार वाटत असे. सौ. अपर्णावहिनींनी म्हटलेले विष्णुसहस्रनाम ते सतत ऐकत होते. त्यांची सेवा माझा भाऊ श्रीकांत व सौ. तृप्तीने मनोभावे केली. त्यासाठी आम्ही सर्व बहिणी कायमच कृतज्ञ आहोत.

## श्रद्धांजली

दि. २० जानेवारी २०२१ रोजी आदित्य प्रतिष्ठानचे एकनिष्ठ कार्यकर्ते डॉ. प्रफुल्ल वाणी यांचे हृदय विकाराने निधन झाले. डॉ. वाणी व सौ. मंगलाताई हे प्रथम अबुधाबी येथे डॉक्टर म्हणून कार्यरत होते.. डॉक्टर हे भूलतज्ज्ञ होते. गुरुदेवांची प्रवचनमाला अबुधाबी, दुबई येथे आयोजित करण्यात त्यांचा व सौ. मंगलाताईंचा मोठा सहभाग राहिला. नंतर ते पुण्यामध्ये स्थायिक झाले व संचेती हॉस्पिटलमध्ये कार्यरत होते. प्रतिष्ठानच्या सर्व योजनांमध्ये ते सदैव सहभागी असत. तसेच अनेक सामाजिक संस्थांमधे त्यांचा सक्रिय सहभाग होता. अत्यंत हसरे, मनमिळावू आणि सर्वांना मदत करणारे व्यक्तिमत्त्व आपल्यातून निघून गेले. गुरुदेवांवर त्यांची अत्यंत श्रद्धा होती. आपल्या सर्व यात्रांमध्ये यात्रेकरूंची काळजी घेण्यात ते व सौ. मंगलाताई सतत व्यग्र असत. प्रतिष्ठानचे संतभारतीचे काम आता प्रगतीपथावर असताना असा दुवा निखळावा याचे शल्य मनात आहे. त्यांना सर्वांच्या वतीने आदरपूर्वक श्रद्धांजली!


डॉ. प्रफुल्ल वाणी



# माझ्या तरुण मित्रांनो!

गुरुदेव

## स्त्री शिक्षणाचे आद्य उद्गाते – समर्थ रामदास

स्त्रियांविषयीचा समर्थांचा दृष्टिकोण पराकोटीचा उदार होता. स्त्रियांचे शिक्षण, उपेक्षित स्त्रियांना मार्गदर्शन, विधवांचा प्रश्न अशा अनेक समस्यांचा ऊहापोह आज केला जातो. त्यावर उदंड विचारमंथनही होते. उपाययोजनांचा खल होतो. विशेष असे की समर्थांनी या सर्व समस्यांचा तीनशे वर्षांपूर्वी सखोल विचार केला होता. रामदासी संप्रदायात त्यांनी स्त्रियांना सादर स्थान प्राप्त करून दिले. इतकेच काय, पण त्यातील काही स्त्रिया मठाधिपती झाल्या. नेतृत्वाचे त्यांचे गुण व सक्षमता समर्थांनी जाणली. किती विलक्षण! बाई, आक्का, अंबिका, द्वारका, नबा, मना, आपा, अन्नपूर्णा, सखा, गंगा, गोदा, अंता, कृष्णा, वेण्णा, मुधा, वाकू, भीमा इत्यादी स्त्रिया रामदासी संप्रदायात मानाचे स्थान मिळवून होत्या. समर्थांच्या निर्वाणानंतर आक्काबाईंनी जवळजवळ चार दशके चाफळच्या मंदिर-मठाची व्यवस्था उत्तम रीतीने सांभाळली होती. वेण्णाबाईंचा अधिकार मोठा होता. वेण्णाबाईंचा गौरव 'मुख्य भक्ती संस्थान' म्हणून गिरिधरांनी केला आहे. समर्थांच्या पुढेही त्या उत्तम कीर्तन करत. त्यांची अभंगवाणी आजही लोकप्रिय आहे. त्यांचा 'सीता-स्वयंवर' ग्रंथ अप्रतिम आहे. त्या महंतपदी विराजमान झाल्या होत्या. चाफळच्या श्रीरघुनाथ यात्रेसाठी सखाबाई उत्तम व्यवस्था ठेवत असत. शेकडो-हजारो भक्तगण उत्सवासाठी जमत. त्यांची नेटकी व्यवस्था करणे हे काही सोपे नव्हते. पण सखाबाई हे कार्य उत्तम प्रकारे सांभाळत. संप्रदायातील सर्व स्त्रियांना रामायण, महाभारत, भागवत, विविध गीता इत्यादींचे शिक्षण देण्यावर समर्थांचा भर होता. समाजातील काही विधवा वा उपेक्षित स्त्रियांना मातापित्याच्या वात्सल्याने पोटाशी धरून, शिकवून, समर्थांनी त्यांना महंतपदी बैसविले.

तुळजा भवानी, सीता माता, कौसल्या, अंजनी इत्यादी स्त्रियांचा सादर गौरव समर्थ वाङ्मयात आहे. समर्थ वाङ्मयात स्त्रीटीकेचा एकही शब्द नाही. उलट त्यांच्या उद्धाराचा त्यांना ध्यास लागलेला दिसतो.

**बालकास वाढवी जननी ।**<br>
**हे तो नव्हे पुरुषाचेनी ।**<br>
**उपाधि वाढे जयाचेनि ।**<br>
**ते हे वनिता ।।**<br>
**वीट नाही, कंटाळा नाही ।**<br>
**आलस्य नाही, त्रास नाही ।**<br>
**इतुकी माया कोठेचि नाही ।**<br>
**माते वेगळी ।।** (दासबोध १७.२.२६ व २७)

स्त्रियांच्या उद्धाराचा असा कळवळा अंत:करणात असलेला दुसरा संत नाही.

* * *

प्रकाशक, मुद्रक, मालक : **सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर** (कार्यकारी विश्वस्त - आदित्य प्रतिष्ठान)
४/१५, वेदान्तनगरी सोसायटी, कर्वेनगर, पुणे-४११ ०५२
संपादक : **सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर** यांनी हे त्रैमासिक
४/१५, वेदान्तनगरी सोसायटी, कर्वेनगर, पुणे-४११ ०५२ येथून प्रसिद्ध केले.
सहसंपादिका : सौ. रश्मी अरुण तुळजापूरकर, सौ. सुलभा श्रीकांत आठवले, सौ. आरती आदित्य अभ्यंकर
REGISTERED : RNI No. MAHMAR / 2010 / 31595